# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (राष्ट्रीय सेवा योजना)

डॉ. श्याम खंडारे
संचालक
मो. क्र. ७०२०४८२४४३

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५
web: www.unigug.org
Email: nssdsw.gug@gmail.com

जा.क्र. गो.वि./रासेयो/ 627 /२०२३

दि. 18 /10 /२०२३

प्रति,

मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, सर्व संलग्नीत महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय - प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राबाबत**

संदर्भ - मंत्री कौशल्य, रोजगार, उद्योजगता व नाविन्यता महाराष्ट्र मंत्रालय, मुंबई यांचे दि. १७.१०.२०२३ रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, वरिल संदर्भिय पत्रानुसार भारत हा जगातील सर्वात युवा देश आहे. भारतातील युवा वर्ग ही आपली खुप मोठी आणि महत्वाची साधन संपत्ती आहे. या युवा कौशल्य, रोजगार, उद्योजगता व नाविन्यता विभाग अनेक योजनांच्या माध्यमांतून महाराष्ट्रातील युवक- युवतींना कौशल्य प्रदान करण्यासाठी व त्यांच्यामध्ये उद्योजगता निर्माण होण्यासाठी सतत वेगवेगळया योजना राबवित असतात.

यासाठी स्थानिक पातळीवरील रोजगार व स्वयंराजगार निर्माण व्हावा याकरीता पहिल्या टप्प्यात ग्रामिण भागांत ५०० प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र सुरु करणार आहेत. याकरीता मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मादीजी हे गुरुवारी दि. १९.१०.२०२३ रोजी सार्यकाळी ठिक ४.०० वाजता या ५०० ग्रामीण कौशल्य विकास केंद्राचे ऑनलाईन उद्घाटन करणार आहेत, असे कळविण्यात आलेले आहे.

**तद्अनुषंगाने आपण आपल्या जवळच्या गावातील कौशल्य केंद्राच्या ठिकाणी उद्घाटन कार्यक्रमास आपल्या महाविद्यालयांतील रासेयो कार्यक्रम अधिकारी व जास्तीत-जास्त स्वयंसेवक यांना दि. १९.१०.२०२३ रोजी ठिक ३.३० वाजता आपण आपल्या महाविद्यालयांच्या जवळच्या गावातील कौशल्य केंद्राच्या ठिकाणी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.**

सदरील वरील कार्यक्रमास आपल्या महाविद्यालयांतील रासेयो कार्यक्रम अधिकारी व स्वयंसवेकांचा उपस्थिती बाबतचा अहवाल रासेयो कार्यालयांत दि. २०.१०.२०२३ रोजी पर्यंत nssdsw.gug.@gmail.com या ईमेल आयडीवर पाटविण्यात यावा.

(डॉ. श्याम खंडारे)
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी - मा. कुलगुरु योचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांना माहितीस्तव अग्रेशित

मंत्री
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : 17 OCT 2023

प्रति,

प्राचार्य

नमस्कार..

भारत हा जगातील सर्वात युवा देश आहे. भारतातील युवा वर्ग ही आपली खूप मोठी आणि महत्वाची साधन संपत्ती आहे. या युवा वर्गाला योग्य कौशल्य प्रशिक्षण दिल्यास भारताच्या अर्थव्यवस्थेला फार मोठ्या प्रमाणात गती प्राप्त होऊ शकते. महाराष्ट्र शासन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग अनेक योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील युवक युवतींना कौशल्य प्रदान करण्यासाठी व त्यांच्यामध्ये उद्योजकता निर्माण होण्यासाठी सतत वेगवेगळ्या योजना राबवित असतो. याचाच एक भाग म्हणून ग्रामीण भागाकडून शहराकडे होणारे स्थलांतराचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी स्थानिक पातळीवरील रोजगार व स्वयंरोजगार निर्माण व्हावा याकरिता पहिल्या टप्प्यात आपण ग्रामीण भागात 500 'प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र' सुरु करीत आहोत. मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदीजी हे गुरुवारी दि.19 ऑक्टोबर 2023 रोजी सायंकाळी 4.00 वाजता या 500 ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांचे ऑनलाईन उद्घाटन करणार आहेत. मी आपल्याला तसेच आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांना या ग्रामीण कौशल्य विकास केंद्राच्या ऑनलाईन उद्घाटन कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी निमंत्रण देत आहे.

आपण आपल्या जवळच्या गावातील कौशल्य केंद्राच्या ठिकाणी उदघाटन कार्यक्रमाला उपस्थित रहावे. आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांना देखील उदघाटन कार्यक्रमासाठी पाठवावे. उदघाटन कार्यक्रमांच्या स्थानाची माहिती माझ्या विभागाचे अधिकारी आपल्यापर्यंत पोहचवतील.

आपण सर्व एकत्र येऊन भारताच्या युवाशक्तीला कुशल युवाशक्ती मध्ये रूपांतरित करून भारताच्या उज्वल भविष्यासाठी व मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांचे भारताला 5 ट्रिलियन अर्थव्यवस्था करण्याच्या स्वप्नाला हातभार लावण्यासाठी प्रयत्न करूया.

धन्यवाद.

मंगल प्रभात लोढा

(मंगल प्रभात लोढा)

कार्यालय पत्ता : दालन क्र. २०२, २ रा मजला (मुख्य इमारत), मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दूरध्वनी क्र. : ०२२ २२०० २५३०८ / २२०२ ४५९२, ई-मेल : min.skills@maharashtra.gov.in

Scanned with OKEN Scanne